Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-II
April - June - 2019
Marathi / Hindi Part - II

IMPACT FACTOR /
INDEXING 2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# ६. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हाने – एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. तंगलवाड दत्ता एम.**
कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी, ता. गेवराई, जि. बीड.

**प्रस्तावना**

कुटूंबसंस्थेचे आधारभूत व महत्वपूर्ण घटक म्हणून स्त्री आणि पुरूष या दोघांकडे पाहिले जाते, पुरूषांच्या जीवनाला प्रभावशाली बनवण्यात स्त्रीचे मोठे योगदान असते, म्हणजे समाजाच्या जडणघडणीत स्त्रियांचे महत्व आहे. वैदिक कालखंडात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या सर्व क्षेत्रात स्त्री प्रभावी होती पण शिक्षण व उपनयन संस्काराचा अधिकार भारतीय स्त्रीला नव्हता. जीवनसाथी निवडणे, विधवा विवाह, प्रौढ विवाह करण्याची पध्दत भारतीय समाजात होती, म्हणजेच वैदिक काळात भारतीय स्त्रीला गौरवशाली स्थान होते. असे विविध धर्मग्रंथांचे अवलोकन केल्यास दिसुन येते पण उत्तर वैदिक काळात मनुस्मृतीच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्री जीवनाचा दर्जा घसरला. दिवसेंदिवस महिलांवर अनेक बंधनले लागली होती. स्त्री विरोधी अनेक प्रथा उदयाला आल्या. "**स्त्री शुद्र पशु नारी सब ताडणके अधिकारी**" असे मानले जावु लागले. बालविवाह, सतीप्रथा, विधवा विवाहास बंदी, केशवपण यासारख्या अनेक प्रथामुळे स्त्री जीवनाला दास्य प्राप्त झाले.

भारतात ब्रिटीशाच्या आगमनानंतर सामाजिक जीवनात अमुलाग्र बदल घडुन आले. प्रबोधनाच्या कालखंडात देशातील वेगवेळया राज्यामध्ये समाजसुधारकाने अनेक चळवळी केल्या. त्यात राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे, ईश्वरचंद्र विद्यासागर आदींचे मोलांचे योगदान आहे. स्त्री–दलित–अस्पृश्यांच्या जीवनातील दास्य दुर करण्यामध्येच यांनी आपले समग्र आयुष्य वेचले. तरीही स्त्री जीवनात फारशी सुधारणा झालेली नसल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्ती नंतर देशाच्या राज्यघटनेत स्त्री सक्षमीकरणासाठी व संरक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले. "महिलाओंको कानुनी दृष्टी से और वास्तविक रूप से पुरूषोंकी बराबरी का दर्जा देना 20 वी शताव्दी का एक महान राजनितीक परियोजना है। 21 वी सदी में यह कार्यक्रम विशेष रूप से आगे बढाना हैं। असा उल्लेख 1996 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या रिपोर्टमध्ये केला आहे."[1] 'भारतीय दंडविधान संहिता कलम 498 अ नुसार एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा नातेवाईकाने त्या स्त्रला केलेली मारहान किंवा छहवणूक दंडनीय गुन्हा आहे.'[2] त्यामुळे भारतात महिला संरक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले. त्यामध्ये अगदीच अलीकडच्या काळात करण्यात आलेला कायदा म्हणजे **कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005** हा होय. प्रस्तुत लघु शोध निबंधात या कायद्याचे, कायद्याचे स्वरूप , परिणामकारकता व महिलांपुढील आव्हानांचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान**

"कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रीयांपुढील आव्हाने – एक समाजशास्त्रीय अभ्यास."

**संशोधनाची उदि्दष्टे**

1. कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायदयाचे स्वरूप समजावून घेणे.

2. कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायद्यामुळे महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या प्रमाणात घट झाली का ? याचा शोध घेणे.
3. कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायद्याची अंमलबजावणी शासकीय यंत्रणेने योग्य प्रकारे केली का? याचा शोध घेणे.
4. या कायद्याचा फायदा व गैरफायदा घेण्याच्या प्रमाणाचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

1. कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायदयाचा प्रचार व प्रसार सर्वसामान्य माणसापर्यंत झाला नाही.
2. कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायदयाची योग्या प्रकारे अंमलबजावणी होत नाही.
3. अनेक महिला न्याय मागण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत परिणामी हिंसाचाराच्या बळी पडतात.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनात महिला संरक्षणासाठी शासनाने केलेले अनेक कायदया पैकी 2005 साली आमलात आणलेल्या कौटुंबीक हिसांचारापासून महिला संरक्षण कायदा 2005 या कायद्याचे स्त्री जीवनातील परिणाम आणि प्रभावाचा अभ्यास करण्यात आला आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागातून प्रत्येकी 50 महिलांची निवड करण्यात आली होती.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत लघु संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा**

प्रस्तुत संशोधनात शासनाने केलेल्या महिला संरक्षणासाठी विषये विविध कायदयापैकी फक्त कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रीयांपुढील आव्हाने या बाबीचा आढावा घेण्यात आला असुन " कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005" ही या संशोधनाची क्षेत्र मर्यादा आहे.

**तथ्य संकलनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम सामुग्रीचा वापर करण्यात आला असून . त्यात मूलाखत अनुसूचीचा ,निरीक्षण,या तंत्र तसेच संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र व इंटरनेट हाताळण्यात आले.

**माहितीचे विश्लेषण**

"कुटूंबात घडणा-या कोणत्याही स्वरूपाच्या हिंसाचारास बळी पडणाऱ्या महिलांच्या संरक्षणासाठी संविधानाने हमी दिलेल्या हक्कांचे अधिक प्रभावीपणे संरक्षण करण्याची आणि त्यांच्याशी संबंधीत किंवा तदनुषंगीक अशा बाबींची तरतुद करण्यासाठी अधिनियम क्रमांक 43 अन्वये 13 सप्टेंबर 2005 रोजी कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे सरंक्षण करण्याबाबत अधिनियम 2005 पारा करण्यात आला असुन जम्मू काश्मीर राज्ये वगळता संपूर्ण भारतभर 26 ऑक्टोबर 2006 रोजी आमलात आणण्यात आला.[3] या कायद्याच्या अधिनियमावलीत कौटुंबीक हिंसाचाराची संकल्पना पुढीलप्रमाणे केली आहे.

**कौटुंबीक हिंसाचाराची व्याख्या**

1.**कौटुंबीक हिंसाचार कायदा 2005 मध्ये प्रकरण दोनमध्ये कौटुंबीक हिसांचाराची व्याख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे**. "पीडित व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षीतता, जीवन अवयव किंवा मानसीक वा शारीरिक स्वास्थ्य यांना हानी, क्षती किंवा धोका पोहचत असेल किंवा तसे करण्याकडे त्याचा कल असेल आणि त्यामध्ये शारिरीक दुर्व्यवहार, लैंगीक दुर्व्यवहार, शाब्दीक व भावनिक दुर्व्यवहार आणि आर्थिक दुर्व्यवहार घडवून आणण्याचा समावेश असेल किंवा हुंडा किंवा मालमता किंवा दस्तऐवज आदी कोणत्याही बेकायदेशीर मागणीची पुर्तता करण्यासाठी पीडित व्यक्तीवर किंवा तिच्याशी संबंधी कोणत्याही व्यक्तीवर जबरदस्ती करण्याच्या दृष्टीने पीडित व्यक्तीचा छह हानी होत असेल त्याला **कौटुंबीक हिंसाचार** असे म्हटले जाते"[4] म्हणजेच संबंधीत स्त्री सोबत शारीरिक, मानसिक, भावनिक आणि लैंगिक बाबतीत होणारा दुर्व्यवहार, एवढचे नव्हे तर अवमान कुचेष्टा अवहेलना अपशब्द वापरणे मुलबाळ नसल्यामुळे कुचेष्टा करणे कौटुंबिक हिंसाचाराच होय आणि ते कायद्याने गुन्हा समजले जाते. अशा प्रसंगी संबंधीत स्त्री पोलिस अधिका–याकडे दाद मागु शकते, एवढेच नव्हे तर ही माहिती इतर कोणतीही व्यक्ती पोलिस अधिका–याकडे देवू शकते अशी माहिती सदभावपुर्वक देणा–या व्यक्तीवर कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाचे दायित्व ओढवणार नाही. अशा प्रकारची तक्रार "भारतीय दंड संहितेच्या कलम 498 क प्रमाणे कुठेही करता येते, तसेच विधी सेवा प्राधिकरण, अधिनियम 1987 कलम 39 अन्वये मोफत कायदेविषयक सल्ला, वैद्यकीय सेवा देण्याची तरतुद करण्यात आली आहे."[5]

थोडक्यात म्हणजे कुटूंबातील पती, सासु–सासरे, नंणद व इतर नातेवाईकांनी स्त्रीवर केलेला शारीरिक हल्ला किंवा संशय घेवून त्रास देणे इत्यादी सर्व बाबींना कौटुंबिक हिंसाचार असे म्हटले जाते. असे प्रकरण तीन दिवसाच्या आत सुनावणीस घेवून सात दिवसा प्रकरण निकाली काढण्याची शिफारस करतील अशी तरतुद करण्यात आली आहे.

**कौटुंबीक हिंसाचार 2005 चे स्वरूप**

एकोणिसाव्या शतकातील भारत हा महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहणारा विसकनशील देश असुन समाजातील अनेक कुप्रथ नष्ट झाल्या पण स्त्रीवर होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढतच आहेत. "संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार भारतात दररोज 13 मिनीटाला 01स्त्री पतीकडुन मारल्या जाते. दर 54 मिनीटाला 01बलात्कार होतो, यापुर्वीच्या कायद्यातील तरतुदी नुसार स्त्रीयांना दिले जाणारे संरक्षण अपुरे असल्यामुळे कौटुंबीक हिंसाचार कायदा 2005 मध्ये नव्याने तयार करण्यात आला."[6] स्त्रीवर होणारे अत्याचार हे प्राचीन काळापासून संपूर्ण विश्वात अस्तीत्वात आहे. पुरूषामध्ये वाढत चाललेली स्वार्थी प्रवृत्ती, प्रेमसंबंधत होणारी वाढ हे स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचेमुळ कारण आहे. सर्व जाती धर्मात, श्रीमंत, गरीब कुटूंबात कमी अधिक प्रमाणात कौटुंबीक हिंसाचाराचे प्रकार घडताना दिसुन येतात. आपल्याच घरात आपल्याच कुटूंबातील इतर सदस्यापासून स्त्री सुरक्षित नाही. कौटुंबीक हिंसा ही घरात घडते व घरात घडणारी हिंसा ही दुर्लक्षीत होते. कौटुंबीक हिंसाचाराला बळी पडलेल्या स्त्रीला सहज व लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला. बहुतेक स्त्रीविषयक कायदे व तरतुदी एकाच चौकटीत समावून घेणारा हा कायदा आहे. "हिंसामुक्त स्त्री जीवन हा निःसंशयपणे तिच्या मानवी अधिकाराचा दखलपात्र विषय आहे, म्हणून या कायद्यामुळे केवळ विवाहीतच नव्हेतर अविवाहीत स्त्री, लहान मुले–मुली, आई–वडील व इतर सर्व संबंधीत कौटुंबीक सदस्यांना आश्रय घेवु शकतात. त्यांना संरक्षण देणारा अधिकारी शक्यतो स्त्री असावी अशी तरतुद आहे. या कायद्याचे उल्लंघन झाल्यास अशा व्यक्तीस एक वर्ष कैद किंवा 20 हजार रूपये दंड किंवा दोन्ही स्वरूपात शिक्षा दिली जावु शकते,हा गुन्हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा समजण्यात येतो." [7]

अशाप्रकारे भारतीय स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारावर निर्बंध घालण्यासाठी अमलात आलेल्या कायदयाविषयी समाजातील स्त्रीयांमध्ये किती जाणीवजागृती आहे ? व महिला कायदाचा आधार घेतात का ? हे पाहण्यासाठी 50 प्रश्नांची मुलाखत अनुसूची तयार करून 100 महिलांचा सर्वे केला असता प्राप्त झालेली माहिती पुढील कोष्टकात दिलेली आहे.

**कोष्टकात क्र.01**

| महिलांचा कायदेविषयक ज्ञान शोध घेणारे कोष्टक ( प्रत्येकी 100% ) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | ग्रामीण | प्रत्येकी शेकडा प्रमाण | शहरी | प्रत्येकी शेकडा प्रमाण |
| होय | 26 | 52% | 44 | 88% |
| नाही | 24 | 48% | 06 | 12% |
| एकुण | 50 | 100% | 50 | 100% |

**विश्लेषण**

वरील कोष्टकावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण भागात कायद्याविषयीची जाणकारी असण्याचे प्रमाण फक्त 52% आहे. तर हेच प्रमाण शहरी भागात 88%आहे. म्हणजे ग्रामीण भागात कायद्याविषयी जाणीव जागृती शहरी भागरच्या तुलनेत खुपच कमी आहे. म्हणजेच ग्रामीण भागात कायद्याविषयी अज्ञानी माणसाचे प्रमाण जास्त आहे.

कोष्टक क्र.02

| कायद्याचा आश्रय घेण्यासंबंधी महिलांची अभिवृत्ती दर्शविणारे कोष्टक ( प्रत्येकी 100% ) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | ग्रामीण | प्रत्येकी शेकडा प्रमाण | शहरी | प्रत्येकी शेकडा प्रमाण |
| होय | 09 | 18% | 13 | 23% |
| नाही | 41 | 82% | 47 | 94% |
| एकुण | 50 | 100% | 50 | 100% |

**विश्लेषण**

वरील कोष्टकावरून हे असे स्पष्ट होते की, ग्रामीण भागात 18% प्रतिनिवेदकांनी कायद्याचा आश्रय घेतला आहे. तर शहरी भाग्रात 23% प्रतनिवेदाकानी कायद्याचा आश्रय घेतला आहे. म्हणजेच कायद्याची माहिती असुन कायद्याचा आधार घेणाऱ्याचे प्रमाण वाढत असलेचे दिसून येते.

**स्त्रियांपुढील आव्हाने**

1. घरगुती हिंसाचार हा स्त्री जीवनासाठी अभिशाप ठरला आहे. अत्याचारग्रस्त स्त्री त्याच्यासाठी बनलेल्या संरक्षण कायद्याची मदत घेण्यासाठी अनेकवेळा अकार्यक्षम असतात अशावेळी कायद्यांतील तरतुदी फोल ठरतात.
2. अनेकवेळा अत्याचारग्रस्त स्त्रीची फिर्यादच नोंदवुन घेतली जाते. अनेकवेळा राजकीय दबावामुळे संरक्षण करणारे अधिकारीच अकार्यक्षम ठरतात.
3. ग्रामीण व दुर्गम भागातील स्त्रीला अजूनही आपल्या हक्काचीही जाणीव नाही व अशा प्रकारचा कायदा आहे याची माहिती देखील बऱ्याच महिलाना नाही

4. घरात होणारे अत्याचार हे पोलीस स्टेशनपर्यंत जाणार नाहीत यासाठी घरातील मंडळींचा प्रचंड दबाव असतो. परंपराप्रिय स्त्री बदनामी नको या भावनेतून न्यायालय वा पोलिसस्टेशनची पायरी चढत नाही.
5. न्यायालय व पोलीस स्टेशनला गेल्यावर योग्य न्याय मिळेलच याची खात्री नाही, कारण आज न्यायव्यवस्थेवर सामान्य माणसाचा 100 विश्वास राहिलेला नाही.
6. कौटुंबीक हिंसांचारापासून संरक्षण कायद्याव्दारे मोफत संरक्षण देण्याची तरतुद असली तरी प्रत्यक्षात कोणत्याही न्यायालयात व पोलीस स्टेशनमध्ये पैशांशिवाय कोणतेही काम होत नाही हे वास्तव आहे. यामुळे अनेकवेळा अन्यायग्रस्त स्त्री न्याय मागण्यसाठी पुढे धजत नाही.
7. पती हा आपला जीवनाचा जोडीदार व सात जन्माचा सोबती आहे, ही भावना भारतीय समाजातील स्त्रीच्या मनात दृढ असल्यामुळे पतीच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस करत नाही. पती कितीही व्यसनी असला तरी त्याला पतीदेव मानणा–या स्त्रीयांचे प्रमाण आजही भारतात आहे. या स्त्रीया पती व सासरच्या मंडळीकडुन होणारा त्रास सहन करतात पण न्याय मागण्याचा प्रयत्न करत नाहीत. काही स्त्रीया न्याय मागण्यासाठी पुढे येताना दिसतात तर काही स्त्रिया कायद्याच्या गैरफायदा घेतात हे ही दुर्लक्ष करून चालणार नाही.

**सारांश**

भारतीय समाजातील स्त्रीला पारंपारीक प्रथा व परंपराच्या जखडातून मुक्त करून मुक्त श्वास घेण्याची संधी देण्यासाठी व घरातच होणा–या हिंसेपासुन स्वरक्षण करण्यासाठी 2005 मध्ये करण्यात आलेला कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा केल्यामुळे महिलांना आधार मिळाला असला तरी घरात घडणारे स्त्रीविरोधी गुन्हे नैतिक अधःपतनामुळे दिवसेंदिवस वाढताना दिसून येतात, बदलती जीवनशैली, वैवाहिक एकनिष्ठता या प्रमुख बाबी दिवसेंदिवस कालबाहय होताना दिसुन येतात. त्यामुळेच घरातीलच दिर–भाया, सासरे अशा व्यक्तींकडुन घरातील स्त्रीचे शोषण होत आहे. **कुंपणाने शेत खाल्ले तर दाद कुणाकडे मागावी** अशी अवस्था झालेली आहे. तसेच कायद्याचे रक्षकच भक्षक बनल्याचा अनेक महिलांचा सुर दिसुन येतो. अशा एक वा अनेक कारणांमुळे कौटुंबीक हिंसाचारावर नियंत्रण ठेवण्यांस शासन व समाजाला यश प्राप्त होवू शकत नाही हे वास्तव आहे. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005चा प्रसार आणि प्रसार शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागात होत असताना दिसून येतो ग्रामीण भागात 18% प्रतिनिवेदकांनी कायद्याचा आश्रय घेतला आहे. तर शहरी भागात 23% प्रतनिवेदाकानी कायद्याचा आश्रय घेतला आहे. म्हणजेच कायद्याची माहिती असुन कायद्याचा आधार घेणाऱ्याचे प्रमाण वाढत असलेचे दिसून येते. असे असले तरी अनेक महिला अन्याय होत असला तरी कायद्याचा आश्रय घेतांना दिसून येत नाहीत. हे देखील विसरून चालणार नाही.

**निष्कर्ष**

1. कौटुंबीक हिंसाचारापासून संरक्षण करण्यासाठी करण्यात आलेला कायदा सर्वसमावेशक असुन यापूर्वी स्त्री संरक्षणासाठी करण्यात आलेल्या सर्व कायद्याच्या सार या कायद्यामध्ये आहे.
2. यापूर्वी तयार केलेल्या कायद्यात बहुतांशी विवाहीत स्त्रीयांच्या दृष्टीने पोषक होतो,पण हा कायदा विवाहीत, अविवाहीत स्त्री बालक, मुले–मुली एवढेच नव्हे तर हिंसाचाराचा बळी ठरलेल्या पुरूषांना देखील यात आश्रय देण्यात आलेला आहे. कारण आपवादात्मक ठिकाणी स्त्रीकडुन देखील पुरूषांवर अन्याय होण्याची उदाहरणे दिसुन येत आहेत.

3. या कायद्याचा प्रचार व प्रसार शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रमाणात झालेला दिसुन येतो. अनेक महिलांना या कायद्याचे स्वरूप देखील माहित नाही.
4. न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळाले याची 100 टक्के खात्री नसल्यामुळे स्त्रीया न्यायालय व पोलिस स्टेशनची पायरी चढण्यापेक्षा अन्याय सहन करणे पंसद करतात.
5. स्वयंसेवी व सेवाभावी संस्था, समुपदेशन केंद्र पक्षपाती धोरणाचा अवलंब करतात परिणामी महिलांचा कायद्याच्या व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदासीन होताना दिसत आहे.

## शिफारशी

1. .शासन व स्वयंसेवी संस्थांनी सामान्य जनतेला कायद्याची जाणीव करून द्यावी परिणामी भीतीने लोक स्त्री विरोधी गुन्हेगारी कृत्य करणार नाहीत.
2. हुंडाप्रथा ही स्त्रीवर होणा–या अन्यायाची जननी असल्यामुळे हुंडा पध्दती विरोधी प्रबोधन करणे काळाची गरज आहे. चर्चासत्र, व्याख्याने आयोजित केल्यास सामाजिक परिवर्तनाला चालना मिळाल्यास मदत होईल.
3. स्त्रीयांवर होणारा अन्याय प्रकाशात आणणे काळाची गरज आहे. कारण कुटूंबात अनेक गुन्हे बाहेरच येत नाहीत. अन्याय करण्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार आहे हे प्रत्येक स्त्रीला समजावून सांगणे काळाची गरज आहे.

## संदर्भ सूची

1 डॉ.गोटे–गव्हाणे 2004 महिला सबलीकरण स्वरुप व समस्या वरद पब्लिकेशन, औरगाबाद
2 डॉ गाठाळ एस.एस.2013 भारतीय इतिहासतील स्त्रियाया व स्त्रि जीवन कैलाश पब्लिकेशन्स औरंगावाद.
3 भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय,अधिनियम क. 43,(2005) कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 प्रकरण एक.
4 भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय,अधिनियम क. 43,(2005) कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 प्रकरण एक.
5 डॉ. काळदाते सुधा, (2005), भारतीय समाज प्रश्न आणि समस्या,विद्या बुक्स पब्लिशयर्स, औरंगाबाद
6 भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय,अधिनियम क. 43,(2005) कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 प्रकरण दोन
7 डॉ. कन्हाळे, (2009),भारतीय समाज प्रश्न आणि समस्या,पिंपळापुरे ॲड पब्लिशयर्स, नागपूर